# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ३०

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरुवार दिनांक ०८/०५/२०२५ दुपारी ०५-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्री.किशोर सुडके | सहाय्यक आयुक्त |
| ५. | श्री.बाळासाहेब थत्तु | मुख्यलेखाअधिकारी |
| ६. | श्री शाहेद शेख मो.शेख | मुख्यलेखापरीक्षक |
| ७. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ८. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| ९. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता |
| १०. | श्री नवनीत सोनवणे | कार्य. अभियंता |
| ११. | संपदा कुलकर्णी | प्र. आरोग्याधिकारी |
| १२. | श्री.राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १३. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १४. | श्री चंद्रकांत जाधव | प्र. मलेरीया पर्यवेक्षक |
| १५. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १६. | श्री एन के बागुल | उप अभियंता , विद्युत विभाग |
| १७. | श्री.प्रदीप चव्हाण | उप अभियंता, बांधकाम विभाग |
| १८. | श्री.राजेंद्र माईनकर | भांडारपाल, भांडार विभाग |
| १९. | श्री मधुकर निकुंभे | वसुली विभाग |
| २०. | श्री गणेश सुर्यवंशी | लिपीक शिक्षणमंडळ |
| २१. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २२. | श्री.अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २३. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-४८४ आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन 2024-25 निधी अंतर्गत धुळे शहरात पांझरा नदी काठावरती Butterfly LED Tree बसविणे (एकूण 4 नग) कामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता मा. आमदार धुळे शहर यांनी केलेल्या शिफारशीवरुन आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२४-२५ अंतर्गत निधी प्राप्त झालेला आहे. या अंतर्गत आमदार महोदयांनी सुचविल्याप्रमाणे सुचविल्याप्रमाणे शहराच्या मुख्य चौकांमध्ये बटरफलाय एलईडी ट्री बसविणार आहे. ई निविदा मागविण्यात येवुन त्यात मे समवील पावर ॲण्ड इन्फ्रा प्रा.लि. यांची अंदाजपत्रकीय दराने आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६२ दिनांक ०८/०५/२०२५**

धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावानुसार धुळे महानगरपालिका मा. जिल्हाधिकारी सो. यांची प्रशासकीय मान्यता म. जिल्हाधिकारी. धुळे यांच्याकडील प्रशासकीय मान्यता आदेश: म. जिल्हाधिकारी प्रशासकीय मान्यता जा.क्र. जीनिस/O/2025/Mar/AAO/02992 दि. 17/03/2025 रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु. 25,99,960/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | मे.समवील पावर & इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे | अंदाजपत्रकीय दराने | L१ |
| 2 | मे.प्रगती इंजिनिअरिंग वर्क्स ,धुळे | अंदाजपत्रकीय दराच्या 5 % जास्तीने | |
| 3 | मे शिवानी इंटरप्रायझेस ,धुळे | अंदाजपत्रकीय दराच्या 2 % जास्तीने | |

ठेकेदार मे.समवील पावर & इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. 25,99,960/- इतक्या रकमेची असुन ती अंदाजपत्रकीय दराची आहे.

सदर कामी निविदेत ठेकेदार मे.समवील पावर & इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे यांचे दर तुलनेत सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.समवील पावर & इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे यांनी सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन 2024-25 निधी अंतर्गत धुळे शहरात पांझरा नदी काठावरती Butterfly LED Tree बसविणे (एकूण 4 नग) कामी मे.समवील पावर & इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. धुळे यांच्या आलेल्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**

**आयुक्त तथा प्रशासक,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४८५ मुलभूत सोई सुविधा विकास योजने अंतर्गत धुळे मनपा हद्दीत 1 ते 10 ठिकाणी ओपनजिम साहित्य बसविणे कामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता मुलभुत सोईसुविधा योजनेअंतर्गत धुळे मनपा हददीत सदरच्या कामचा शासनाने जीआर काढला होता. त्यानुसार सदरचा प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी महोदयांनी मान्यता दिली आहे. ईनिविदा मागविण्यात येवुन त्यात राधेकृष्ण इन्फ्रा. यांची निविदा अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी दराची आलेली आहे. दरास मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६३ दिनांक ०८/०५/२०२५**

मुलभूत सोई सुविधा विकास योजने अंतर्गत धुळे मनपा हद्दीत 1 ते 10 ठिकाणी ओपनजिम साहित्य बसविणे कामास म.जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. कक्ष- 5 / नपाप्र / बांध / 282 दि. 13/03/2025 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. 99,99,500/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ 555 ते 564 दिनांक 14/10/2024 अन्वये रक्कम रु. 99,99,500/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.सौरभ संजय कदमबांडे | शे.२% जास्तीने | |
| २ | अे.के.सैफी | शे.१% जास्तीने | |
| ३ | राधेकृष्ण इन्फ्रा. | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे.राधेकृष्ण इन्फ्रा , धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे.राधेकृष्ण इन्फ्रा यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरी साठी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार मुलभूत सोई सुविधा विकास योजने अंतर्गत धुळे मनपा हद्दीत 1 ते 10 ठिकाणी ओपनजिम साहित्य बसविणे कामी मे.राधेकृष्ण इन्फ्रा , धुळे यांच्या आलेल्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता देण्यात येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४८६ मनपा निधी सन २०२४-२५ अंतर्गत धुळे मनपा मालकीच्या शाळा दुरुस्ती करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता मनपा निधी सन २०२४-२५ अंतर्गत धुळे मनपाच्या मालकीच्या शहरात २० शाळा आहे. त्या शाळा नादुरुस्त असल्यामुळे मा.आयुक्त महोदयांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव करुन ईनिविदा मागविण्यात येवुन निविदेत आलेल्या दरांमध्ये मे. समर्थ कन्स्ट्रक्शन यांचे दर शे. १.९९ टकके कमीने आलेले आहे. दरास मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा. आयुक्त तथा प्रशासक काल जी मुख्याध्यापकांची बैठक झाली त्यामध्ये जी चर्चा झाली त्यातील अगदी नादुरुस्त ज्याचे काही करता येण्यासारखे नाही खुप जुन्या शाळा आहे. त्याचे स्ट्रक्चरल ऑडीट होईल तुम्हाला त्या शाळांसाठी प्रस्ताव टाकायचे आहे आणि तेथे नविन शाळांसाठी निधी मागणी करायची आहे. ज्यांना फक्त डागडुजीची गरज अशा शाळा कराव्या. इन्फ्रास्ट्रक्चर वाढले की, पटसंख्या देखील वाढेल. या सगळया गोष्टी करायच्या आहे. जेवढी मागणी आहे तेवढाच खर्च करावा आणि मग वर्कआऊट करुन घ्यायचे आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६४ दिनांक ०८/०५/२०२५**

मनपा निधी सन २०२४-२५ अंतर्गत धुळे मनपा मालकीच्या शाळा दुरुस्ती करणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका यांनी टिपणी मंजुरीने दि.02/04/2025 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.5,42,58,237/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./01/2025-26 दि.01/04/2025 अन्वये रक्कम रु. 5,42,58,237/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत. विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. समर्थ कन्सट्रक्शन | शे.१.९९% कमीने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. कौस्तुभ सचिन दिक्षित | अंदाजपत्रकीय दराने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर शे.1.99% कमी दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.समर्थ कन्सट्रक्शन यांची शे.1.99% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार मनपा निधी सन 2024-25 अंतर्गत धुळे मनपा मालकीच्या शाळा दुरुस्ती करणेकामी मे.समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर शे.1.99% कमी दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

ज्या शाळा दुरुस्ती करण्यायोग्य आहे त्या शाळांची तातडीने दुरुस्ती करावी. तसेच ज्या शाळा अत्यंत दुरावस्थेत आहेत त्या ठिकाणी नवीन शाळांचा प्रस्ताव निधी मान्यतेसाठी सक्षम प्राधीकरणाकडे सादर करावा. वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४८७ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन 2024-25 अंतर्गत प्र.क्र 02 मध्ये व्दारका नगर येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.२ मध्ये व्दारकानगर भागात रस्ते कॉंक्रिटीकरण करणेबाबत कामास म. जिल्हाधिकारी सो. यांनपी प्र.मा. दिली आहे. ईनिविदा मागविण्यात येवुन त्यात मे. कौस्तुभ सचिन दिक्षीत यांचे शे. -05.51 टक्के कमीने आले आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६५ दिनांक ०८/०५/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र ०२ मध्ये व्दारका नगर येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/ नपाप्र/बांध/१०५३/२०२४-२५ दि.०७/१०/२०२४ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ३९,९६,७९६/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३६०/२०२४ दि.२७/०९/ २०२४अन्वये रक्कम रु. ३९,९६,७९६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले उक्त पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.कौस्तुभ सचिन दिक्षित | शे.-५.५१% कमीने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. बी.आर.भदाणे बिल्डकॉन एल.एल.पी . | शे. -.२१ % कमीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.कौस्तुभ सचिन दिक्षित यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ३७,७६,५७२/- इतक्या रक्कमेचे असून शे.-५.५१% कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.कौस्तुभ सचिन दिक्षित यांचे दर शे.-५.५१% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.कौस्तुभ सचिन दिक्षित यांची शे.-५.५१% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना अंतर्गत प्र.क्र 02 मध्ये व्दारका नगर येथे अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण करणेकामी मे.कौस्तुभ सचिन दिक्षित यांचे -५.५१% कमी या दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४८८ लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन 2024-25 अंतर्गत प्र.क्र.16 मध्ये रेणुका नगर बोर्ड ते साहेबराव गुरव यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.१६ मध्ये रेणुकानगर बोर्ड ते साहेबराव गुरव यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे बाबत कामास मा. जिल्हाधिकारी सो. यांनी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिली आहे. ईनिविदा मागविण्यात येवुन त्यात मे. अमित भावसार यांची शे. ०.२० टक्के कमीने निविदा आली आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६६ दिनांक ०८/०५/२०२५**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.१६ मध्ये रेणुका नगर बोर्ड ते साहेबराव गुरव यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/३४९/२०२५ दि.२५/०३/२०२५ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ४२,३४,०००/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./६०९/२०२४-२५ दि.१८/०२/२०२५अन्वये रक्कम रु. ४२,३४,६०३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहे.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.अमित भावसार | शे. -०.२० % कमीने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.जयेश सतिष मगर | शे.१.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/मे.अमित भावसार यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ४२,२६,१३३/- इतक्या रक्कमेचे असून शे.-.२०% कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.अमित भावसार यांचे दर शे.-०.२०%कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.अमित भावसार यांची शे.-०.२०% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त अहवालानुसार लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधार योजना अंतर्गत प्र.क्र.16 मध्ये रेणुका नगर बोर्ड ते साहेबराव गुरव यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणेकामी मे.अमित भावसार यांच्या शे. -०.२० % कमी या दरास मान्यता मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४८९ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये लेख्यांचा साप्ताहिक तपासणी अहवाल स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.मु.ले.प. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) नुसार साप्ताहिक लेखे तपासणी करुन मे. स्थायी समितीसमोर सादर केले आहे. हा अहवाल दि.1/4/2025 ते दि.02/05/2025 या कालावधीचा आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सर्व संबंधीत विभागांनी अर्ध समासाचे कंम्प्लायन्सेस करुन घ्यावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६७ दिनांक ०८/०५/२०२५**

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी दि. ०१/०४/२०२५ ते दि. ०४/०४/२०२५ पर्यत तसेच दि.०७/०४/२०२५ ते दि.११/०४/२०२५ व दि. १५/०४/२०२५ ते दि. १७/०४/२०२५ पर्यंत तसेच दिनांक २१/०४/२०२५ ते दि. २५/०४/२०२५ तसेच २८/०४/२०२५ ते दिनांक ०२/०५/२०२५ तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला.

या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने लेखा विभागाशी समन्वय ठेऊन याबाबतची पडताळणी करुन आवश्यक ती पूर्तता त्वरीत करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४९० धुळे मनपा नवीन इमारत येथील UPS च्या देखभाल दुरुस्तीसाठी एक वर्षाकरिता AMC नेमणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे मनपा नविन इमारत येथे सद्यस्थितीत १०० KVA चे UPS बसविण्यात आले आहे. हे काम सन 2018 च्या कार्यादेशानुसार काम पुर्ण केले आहे. सदर कामाचा कालावधी समाप्त झालेला आहे. संपुर्ण नविन मनपाच कार्यालय, बँक, संगणक, इंटरनेट, लाईट इ. दैनिक कामासाठी आवश्यक असणारी विद्युत उपकरणे पुरवठा खंडीत झाल्यानंतर याच युपीएस वरुन अखंडीत वीजपुरवठा करुन सप्लाय करण्यात येतो. तांत्रिक अडचणींमुळे युपीएस सिस्टीम कार्यान्वित होत नाही. त्यामुळे दैनंदिन कार्यावर परिणाम होतो. त्यानुसार वार्षिक देखभाल दुरुस्ती (AMC) करीता ठेका देणेबाबत विषय मे. स्थायी समितीसमोर दर मंजुरीसाठी ठेवला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६८ दिनांक ०८/०५/२०२५**

धुळे मनपा नवीन इमारत येथे सद्यास्थितीत १०० KVA चे एक UPS(अल्ट्रा पावर सिस्टीम ऑनलाईन) बसविण्यात आले आहे.सदर काम हे मे.बडगुजर कंपनी,नाशिक यांनी २०१८ च्या कार्यादेशानुसार काम पूर्ण केले आहे.उक्त कार्यादेशीत कामाचा देखभाल दुरुस्ती करावयचा कालावधी दोन वर्ष होता.त्यानुसार सदर कामाचा देखभाल दुरुस्तीचा कालावधी समाप्त झाला

आहे.परंतु संपूर्ण नवीन मनपाचे कार्यालय,बँक,संगणक,इंटरनेट,फ्यान,लाईट ई. दैनंदिन कामासाठी आवश्यक असणारी विद्युत उपकरणे विद्युत सप्लाय खंडित झाल्यानंतर याच UPS वरून अघंडीत वीज पुरवठा करून सप्लाय चालू करण्यात येतो.परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे UPS सिस्टीम कार्यान्वित होत नाही,त्यामुळे दैनदिन कार्यालयीन कामावर परिणाम होतो.त्यामुळे सदर UPS ची वेळेवर देखभाल दुरुस्ती होणे गरजेचे आहे.त्यानुसार वार्षिक देखभाल दुरुस्ती (AMC)करिता Novateur Electrical & Digital Systems Pvt.Ltd,मुंबई यांनी संदर्भ नुसार खालीलप्रमाणे दरपत्रक दिले आहे.सदर दरपत्रकात फक्त UPS ची देखभाल व दुरुस्ती करणे बाबत नमूद असून,यासाठी अतिरिक्त लागणारे साहित्यसाठी वेगेळे चार्जेस लागतील असे दरपत्रकात नमूद आहे.

| Ups no. | No. of Ups | BasiC annual priCe | GST | Total | Lift AMC period |
|---|---|---|---|---|---|
| XII१७१००११३८ (१०० kva) | १ | १,४९,०००/- | २६,८२०/- | १,७५,८२०/- | १२-२-२०२५ to ११-२-२०२६ |
| | | | Total | १,७५,८२०/- | |

करिता उक्तप्रमाणे एक UPS(अल्ट्रा पावर सिस्टीम ऑनलाईन) चे वार्षिक देखभाल दुरुस्ती एक वर्षाकरिता AMC करणे करिता Novateur Electrical & Digital Systems Pvt.Ltd,Mumbai यांना उक्त दराप्रमाणे दर करार करणे करिता व कार्यादेश देणेस सदर विषय मे.स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा नवीन इमारत येथील UPS च्या देखभाल दुरुस्तीसाठी एक वर्षाकरिता Novateur Electrical & Digital Systems Pvt.Ltd,Mumbai यांना एक वर्षाकरीता प्रस्तावात नमूद दरानुसार AMC नियुक्ती करणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४९१ — मनपा निधी सन 2025-26 अंतर्गत पावसाळया पूर्वी धुळे मनपा हद्दीतील नैसर्गिक नाले सफाई करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — मनपा निधी सन २०२५-२६ अंतर्गत पावसाळयापुर्वी धुळे मनपा हददीतील नैसर्गिक नाले सफाईबाबत कामास मा.आयुक्त सो. यांनी आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार ईनिविदा मागविण्यात येवुन त्यात २ निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यात मे. समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर सर्वात कमी आलेले आहे. दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक — या कामाचे मॉनिटरिंग कोण करणार आहे.

मा.उपअभियंता त्या त्या भागातील सॅनिटरी इन्स्पेक्टर व संबंधीत भागातील इंजिनियर पाहणी करुन कार्यवाही करणार आहेत.

मा.आयुक्त तथा प्रशासक तेथील भागातील लोकांच्या सहया घ्या. निकम सो. तसेच उपअभियंता यांनी पाहणी करावी. या कामात हलगर्जीपणा होता कामा नये. पावसाळयापुर्वी हे काम संपवावे. समजा १०० टन गाळ काढला तर डेपोवर १०० टन भरला पाहिजे. तरच देयक अदा केले जाईल. या कामावर माझे लक्ष राहिल हे लक्षात असु द्या. या कामात कुणाला स्वेच्छेने जेसीबी व पोकलेन देण्याची इच्छा असेल तर त्याची व्यवस्था करा. त्यांना पैसे अदा केले जातील. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४६९ दिनांक ०८/०५/२०२५**

मनपा निधी सन 2025-26 अंतर्गत पावसाळया पूर्वी धुळे मनपा हद्दीतील नैसर्गिक नाले सफाई करणे बाबतच्या कामास मा.आयुक्त सो.धुळे यांनी जा.क्र./धुमपा/आरोग्य/30/2025-26 दि.16/04/2025 उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.55,10,178/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे. समर्थ कन्सट्रक्शन | ५९०० प्रति तास पोकलॅण्ड, ट्रॅक्टर, जेसीबी | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.कौस्तुभ सचिन दिक्षित | ७६०० | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.समर्थ कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 55,10,178/- इतक्या रक्कमेचे असून 5900 दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर 5900 आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.समर्थ कन्सट्रक्शन यांची 5900 प्रति तास (पोकलॅण्ड, ट्रॅक्टर, जेसीबी) दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालनुसार मनपा निधी सन 2025-26 अंतर्गत पावसाळया पूर्वी धुळे मनपा हद्दीतील नैसर्गिक नाले सफाई करणेकामी मे.समर्थ कन्सट्रक्शन यांना रु. 5900/- प्रति तास (पोकलॅण्ड, ट्रॅक्टर, जेसीबी) या दरानुसार मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

सदरचे काम स्वच्छता निरीक्षक व सर्व अभियंता यांच्या समन्वयाने करण्यात यावे. प्रत्यक्ष कामावर दैनंदीन पाहणी करण्यात यावी. तसेच जेवढा गाळ काढण्यात येईल तो संपूर्ण गाळ कचरा डेपो वर नेणेबाबत दक्षता घ्यावी. व दैनंदिन संकलित होणाऱ्या गाळ तथा कचरा याची मोजणी करण्यात यावी. यासाठी अन्य संस्था व्यक्तींमार्फत वाहने उपलब्ध झाल्यास सदर वाहने याकामी घेण्यात यावी.वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**

**अमिता दगडे-पाटील,**

**आयुक्त तथा प्रशासक,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४९२ विकास शुल्क निधी (मनपा निधी) सन 2025-26 अंतर्गत शहरातील गोंदूर विमानतळाच्या धावपट्टीला समांतर दोन नाल्यांना वळविणे व वलवाडी शिवार,भोकर शिवारातील कॉलनी परिसरात तसेच देवपूर पश्चिम भागांतील कॉलनी परिसराचे पुरापासून संरक्षण करण्यासाठी सुशी नाल्यास जोडणी करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.कार्य.अभियंता मागील वर्षी पावसामुळे वलवाडी भागात खुप पाणी साचलेले होते. गोंदुर विमानतळाची धावपटटी व तिच्या बाजुस असलेले दोनही नाले त्याचे पाणी वलवाडी शिवारात येत होते. त्या नालयाला क्रॉस ड्रेन बनवुन अंडरग्राउंड १ मी. व्यासाची पाईपलाईन टाकुन सुशी नाल्याला जोडतोय. यामुळे वलवाडी शिवारात पावसाळी पाण्याचा त्रास होणार नाही. या कामात २ निविदा आल्या आहेत. त्यात मे.इंजि. कौस्तुभ सचिन दिक्षीत यांची अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमी निविदा आली आहे. सदरचा विषय मे. स्थायी समितीसमोर दर मंजुरीसाठी ठेवला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक काम व्यवस्थित करुन घ्यावे. प्रायव्हेट लेआऊट आहे. करतांना त्यांच्याशी कोऑर्डीनेट करा. पाईप प्रॉपर व्यवस्थित टाकुन घ्या. पावसाळयापुर्वी हे काम संपेल हे बघा. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७० दिनांक ०८/०५/२०२५**

विकास शुल्क निधी (मनपा निधी ) सन 2025-26 अंतर्गत शहरातील गोंदूर विमानतळाच्या धावपट्टीला समांतर दोन नाल्यांना वळविणे व वलवाडी शिवार,भोकर शिवारातील कॉलनी परिसरात तसेच देवपूर पश्चिम भागांतील कॉलनी परिसराचे पुरापासून संरक्षण करण्यासाठी सुशी नाल्यास जोडणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका धुळे म.आयुक्त सो., यांचे पत्र जा.क्र./धुमपा/बां.वि./10/2025-26 दि.21/04/2025 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. 99,76,984/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./22/2025-26 दि.22/04/2025 अन्वये रक्कम रु. 99,76,984/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे. इंजि.कौस्तुभ सचिन दिक्षित | अंदाजपत्रकीय दराने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. सचिन पी.दिक्षित | शे.१.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.इंजि.कौस्तुभ सचिन दिक्षित यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 99,76,984/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.इंजि.कौस्तुभ सचिन दिक्षित यांचे दर अंदाजपत्रक आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.इंजि.कौस्तुभ सचिन दिक्षित यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार विकास शुल्क निधी (मनपा निधी) अंतर्गत शहरातील गोंदूर विमानतळाच्या धावपट्टीला समांतर दोन नाल्यांना वळविणे व वलवाडी शिवार,भोकर शिवारातील कॉलनी परिसरात तसेच देवपूर पश्चिम भागांतील कॉलनी

परिसराचे पुरापासून संरक्षण करण्यासाठी सुशी नाल्यास जोडणी करणेकामी मे.इंजि.कौस्तुभ सचिन दिक्षित यांच्या आलेल्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४९३ मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत सन 2024-25 धुळे महानगरपालिका क्षेत्रातील देवपूर अमरधाम येथे अंत्यसंस्काराच्या ओत्यांसह बैठक व्यवस्था व विद्युत व्यवस्था करणे (सोलार, एल.ई.डी.बल्ब व सोलार हायमास्ट वगळून) कामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७१ दिनांक ०८/०५/२०२५**

मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत सन 2024-25 धुळे महानगरपालिका क्षेत्रातील देवपूर अमरधाम येथे अंत्यसंस्काराच्या ओत्यांसह बैठक व्यवस्था व विद्युत व्यवस्था करणे (सोलार, एल.ई.डी.बल्ब व सोलार हायमास्ट वगळून) बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो.धुळे यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/279/2023-24दि.13/03/2025 उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.2,99,99,797/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.584/2025 दि.23/01/2025 अन्वये रक्कम रु. 2,99,99,797/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.समता किचन इंटेरियर प्रॉडक्ट्स | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.अंबिका इन्फ्रास्ट्रक्चर | शे.३ % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.समता किचन इंटेरियर प्रॉडक्ट्स यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 2,99,99,797/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे. वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.समता किचन इंटेरियर प्रॉडक्ट्स यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.समता किचन इंटेरियर प्रॉडक्ट्स यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत सन 2024-25 धुळे महानगरपालिका क्षेत्रातील देवपूर अमरधाम येथे अंत्यसंस्काराच्या ओत्यांसह बैठक व्यवस्था व विद्युत व्यवस्था करणे (सोलार, एल.ई.डी.बल्ब व सोलार हायमास्ट वगळून) कामी मे.समता किचन इंटेरियर प्रॉडक्ट्स यांच्या आलेल्या अंदाजपत्रकीय दरास वाचा क्र. १ व

२ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

सदरचे काम गुणवत्तापूर्वक व दर्जेदार होईल याबाबत दक्षता घ्यावी. तसेच या कामाबरोबर लगत असलेल्या लहान मूलांच्या दफनभूमीचे कामही करण्यात यावे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४९४ मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत सन 2024-25 धुळे महानगरपालिका क्षेत्रातील साक्री रोड अमरधाम येथे अंत्यसंस्काराच्या ओत्यांसह बैठक व्यवस्था व विद्युत व्यवस्था करणे (सोलार, एल.ई.डी.बल्ब व सोलार हायमास्ट वगळून) कामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक काम चांगल्या दर्जाचे झाले पाहिजे. याचे काम प्रॉपर होते का हे क्रॉस व्हिजीलन्स नवनित सोनवणे यांनी पहावे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७२ दिनांक ०८/०५/२०२५**

मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत सन 2024-25 धुळे महानगरपालिका क्षेत्रातील साक्री रोड अमरधाम येथे अंत्यसंस्काराच्या ओत्यांसह बैठक व्यवस्था व विद्युत व्यवस्था करणे (सोलार, एल.ई.डी.बल्ब व सोलार हायमास्ट वगळून) बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो.धुळे यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/279/2023-24दि.13/03/2025 उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. 1,99,99,535/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.584/2025 दि.23/01/2025 अन्वये रक्कम रु. 1,99,99,535/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| **अ.क्र.** | **कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव** | **दिलेले निविदा दर** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १ | मे.समता किचन इंटेरियर प्रॉडक्ट्स | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.अंबिका इन्फ्रास्ट्रक्चर | शे.३ % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.समता किचन इंटेरियर प्रॉडक्ट्स यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 1,99,99,535/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.समता किचन इंटेरियर प्रॉडक्ट्स यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.समता किचन इंटेरियर प्रॉडक्ट्स यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार मुलभूत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत सन 2024-25 धुळे महानगरपालिका क्षेत्रातील साक्री रोड अमरधाम येथे अंत्यसंस्काराच्या

ओत्यांसह बैठक व्यवस्था व विद्युत व्यवस्था करणे (सोलार, एल.ई.डी.बल्ब व सोलार हायमास्ट वगळून) कामी मे.समता किचन इंटेरियर प्रॉडक्ट्स यांच्या आलेल्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-४९५ मुलभूत सोईसुविधांचा विकास योजने सन 2024-25 अंतर्गत 1)धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.2 अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.2)प्र.क्र.16 देवचंद नगर व कृषी नगर येथे रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.3)प्र.क्र.1 वलवाडी शिवार येथे वडेल रस्त्या लगत देवमोगरा सोसा. येथे रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.4)धुळे शहरातील देवपूर परिसरातील गवळी समाज दफन विधी येथे संरक्षण भिंत बांधणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपभियंता मुलभुत सोई सुविधा योजनेअंतर्गत शासनाकडुन जीआर काढण्यात आला होता. त्यानुसार धुळे मनपामार्फत प्रस्ताव तयार करणेस येवुन मा. जिल्हाधिकारी महोदय यांच्याकडे मान्सयतेस्तव सादर करण्यात आला होता. प्रशासकीय मान्यता मिळुन ईनिविदा मागविण्यात आली होती त्यात सर्वात कमी दराची निविदा मागविण्यात आली आहे. त्यात सर्वात कमी दराची निविदा हिंद कन्स्ट्रक्शन यांची आली आहे.दरास मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर करण्यात आले आहे. सदरचा विषय मे. स्थायी समितीसमोर दर मंजुरीसाठी ठेवला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे कामे पावसाळयापुर्वी संपवावे. सर्व चेंबर प्रॉपर बांधले जातात का हे बघुन घ्या. तसेच मॅन्होल पाहुन घ्या. दुय्यम दर्जाचे काम होणार नाही ते बघा. नागरीकांना कमीत कमी त्रास होईल याची दक्षता घ्यावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७३ दिनांक ०८/०५/२०२५**

मुलभूत सोईसुविधांचा विकास योजने सन 2024-25 अंतर्गत 1)धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.2 अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.2)प्र.क्र.16 देवचंद नगर व कृषी नगर येथे रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.3)प्र.क्र.1 वलवाडी शिवार येथे वडेल रस्त्या लगत देवमोगरा सोसा. येथे रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.4)धुळे शहरातील देवपूर परिसरातील गवळी समाज दफन विधी येथे संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो.धुळे यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/280/2024-25 दि.13/03/ 2025 उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.4,99,94,759/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.597/598/600/602/2025 दि.11/02/2025 अन्वये रक्कम रु. 4,99,94,759/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. हिंद कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.प्रतिक पुरुषोत्तम पुरोहित | शे.२.२१० जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/मे.हिंद कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 4,99,94,759/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.हिंद कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.हिंद कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार मुलभूत सोईसुविधांचा विकास योजने सन 2024-25 अंतर्गत 1)धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.2 अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.2)प्र.क्र.16 देवचंद नगर व कृषी नगर येथे रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.3)प्र.क्र.1 वलवाडी शिवार येथे वडेल रस्त्या लगत देवमोगरा सोसा. येथे रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.4)धुळे शहरातील देवपूर परिसरातील गवळी समाज दफन विधी येथे संरक्षण भिंत बांधणेकामी मे. हिंद कन्सट्रक्शन यांच्या आलेल्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४९६ 1)धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.5 अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.2)धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.1 वलवाडी शिवार येथे अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे कामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता मुलभुत सोई सुविधा अंतर्गत या कामाला मंजुरी मिळाली होती. त्यानुसार मा.जिल्हाधिकारी यांनी प्र.मा. दिल्यानंतर ईनिविदा मागविण्यात आली होती त्यात सर्वात कमी दराची निविदा मागविण्यात आली आहे. त्यात सर्वात कमी दराची निविदा हिंद कन्स्ट्रक्शन यांची आली आहे.दरास मंजुरीसाठी मे. स्थायी समिती पुढे सादर करण्यात आले आहे. सदरचा विषय मे. स्थायी समितीसमोर दर मंजुरीसाठी ठेवला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७४ दिनांक ०८/०५/२०२५**

1)धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.5 अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.2)धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.1 वलवाडी शिवार येथे अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे बाबतच्या कामास मा.जिल्हाधिकारी सो.धुळे यांनी क्रमांक 12/क/कक्ष-5/नपाप्र/बांध/281/2024-25 दि.13/03/2025 उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.4,99,96,763/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र.601/599/2025 दि.11/02/2025 अन्वये रक्कम रु. 4,99,96,762/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्तकामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदार किंवा ठेकेदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. हिंद कन्सट्रक्शन | **अंदाजपत्रकीय दराने** | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.प्रतिक पुरुषोत्तम पुरोहित | शे.२.२१० जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/मे.हिंद कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 4,99,96,762/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रकीय दराने आहे.
वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.हिंद कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.हिंद कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार 1)धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.5 अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे.2)धुळे महानगरपालिका क्षेत्रातील प्र.क्र.1 वलवाडी शिवार येथे अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करणे कामी मे. हिंद कन्सट्रक्शन यांच्या आलेल्या अंदाजपत्रकीय दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४९७ — धुळे मनपा मालकीची जुनी प्रशासकीय हेरीटेज इमारत येथे sand ब्लास्टिंग करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता — धुळे मनपा मालकीची जुनी प्रशासकीय इमारतीचे काम केले आहे. त्यात सॅण्ड ब्लास्टिंग करणे आवश्यक होते. त्यासाठी हे अंदाजपत्रक तयार केले होते. दरास मंजुरीसाठी मे. स्थायी समितीसमोर दर मंजुरीसाठी ठेवला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक — या २-३ महिन्यात ती लायब्ररी तयार झाली पाहिजे. कामे तातडीने करावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७५ दिनांक ०८/०५/२०२५**

धुळे मनपा मालकीची जुनी प्रशासकीय इमारत हेरीटेज येथे sand ब्लास्टिंग करणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका धुळे म.आयुक्त सो., यांचे पत्र जा.क्र./धुमपा/बां.वि./44/2024-25 दि.26/03/2025 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. 34,93,854/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.
उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./39 /2023-24 दि.06/05/2025 अन्वये रक्कम रु. 34,93,854/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन | शे.-०.१० % कमीने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे.आशिष एम.पटवारी | शे.२.०० % जास्तीने | |
| ३ | मे. सिद्धेश कन्सट्रक्शन | शे.३.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 34,90,360/- इतक्या रक्कमेचे असून शे.-0.10 % कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर शे.-0.10 % कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांची शे.-0.10 % कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा मालकीची जुनी प्रशासकीय हेरीटेज इमारत येथे sand ब्लास्टिंग करणेकामी .श्री स्वामी समर्थ कन्सट्रक्शन यांच्या शे.-0.10 % कमी या दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-४९८ मनपा निधी सन २०२५-२६ अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सन २०२५-२०२६ या वर्षात प्र.क्र.१ ते १९ मध्ये विविध रस्त्यावरील खड्डे बुजविणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता मनपा निधी सन २०२५-२६ धुळे मनपा हददीतील प्र.क्र. १ ते १९ मध्ये विविध रस्त्यावरील खडउे बुजवणे कामास ई निविदा मागविण्यात येवुन त्यात त्यात मे. समर्थ कन्सट्रक्शन यांचे दर सर्वात शे. -०.९९ टक्के कमीने आलेले आहे. दर मंजुरीस्तव मे. स्थायी समितीसमोर ठेवण्यात आला आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक जेथे युजीडीचे काम चालु आहे तेथे कामे करु नये. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७६ दिनांक ०८/०५/२०२५**

मनपा निधी सन 2025-26 अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील सन 2025-2026 या वर्षात प्र.क्र.1 ते 19 मध्ये विविध रस्त्यावरील खड्डे बुजविणे बाबतच्या कामास धुळे महानगरपालिका धुळे म.आयुक्त सो., यांचे पत्र जा.क्र./धुमपा/बां.वि./06/2025-26 दि.02/04/2025 अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. 98,71,917/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./10/2025-26 दि.02/04/2025 अन्वये रक्कम रु. 98,71,917/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. इंजि.कौस्तुभ सचिन दिक्षीत | शे.-.९९ % कमीने | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. समर्थ कन्सट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे. इंजि.कौस्तुभ सचिन दिक्षित यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 97,74,185/- इतक्या रक्कमेचे असून शे.-.99 % कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे. इंजि.कौस्तुभ सचिन दिक्षित यांचे दर शे.-.99 % कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे. इंजि.कौस्तुभ सचिन दिक्षित यांची शे.-.99 % कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार मे. इंजि.कौस्तुभ सचिन दिक्षित यांच्या शे.-.99 % कमी या दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत आवश्यक खड्डे बुजवणेबाबत कार्यवाही करावी. शहरातील उर्वरित खड्डे पावसाळया नंतर बुजवण्यात यावे. तसेच ज्या ठिकाणी भूमिगत योजनेचे काम प्रस्तावित आले त्या ठिकाणी खड्डे दुरुस्तीबाबत कार्यवाही करण्यात येऊ नये.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**